पुण्य नगरी
शनिवार, २२ जून २०२४

# योगामुळे सदृढ शरीरासह परिपक्व मन : डॉ. कुंभार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

एकविसाव्या शतकात भारतीय संस्कृती आणि विचार जगाला दिशा देणारे आहेत. योग आणि ध्यानधारणा याद्वारे दैनंदिन जीवनातील ताणतणाव कमी करून ध्येय साध्य करता येते. योगामुळे आपणास सदृढ शरीरासोबत परिपक्व मनाची निर्मिती करता येते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात बोलत होते.

महिला सक्षमीकरणासाठी योग हा कार्यक्रम योग गुरू विलास गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. यावेळी ६ महाराष्ट्र एनसीसी गर्ल्स बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, ५ महाराष्ट्र एनसीसीचे मानस दीक्षित, सुहास काळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन कॅप्टन सुनीता भोसले, एनएसएसप्रमुख प्रा. संदीप पाटील यांनी केले. डॉ. राजश्री पाटील, प्रा. यू. आर. हिरकुडे, प्रा. एल. एस. नाकाडी, प्रा. रविराज सुतार उपस्थित होते.

प्रास्ताविक लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी केले. आभार प्रा. बागडी यांनी मानले. आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, रजिस्टार रघुनाथ जोग यांचे सहकार्य लाभले.

21/06/2024

PE 22/6/24

epaper.lokmat.com
कोल्हापूर, शनिवार, दि. २२ जून २०२४ ६

# सायली पाटील बनली सहायक अभियंता



किणी : किणी (ता. हातकणंगले) सायली धन्यकुमार पाटील हिची राज्य शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या निवड परीक्षेतून जलसंपदा विभागात सहायक अभियंतापदी निवड झाली. तिचे शिक्षण मराठी माध्यमातून झाले असून प्राथमिक शिक्षण कन्या विद्या मंदिर, माध्यमिक शिक्षण किणी हायस्कूल, उच्च माध्यमिक शिक्षण विवेकानंद कॉलेज कोल्हापूर व पदवीचे सिव्हिल इंजिनिअरिंगचे शिक्षण केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून पूर्ण केले आहे. तिला शिक्षकासह, आई, वडील, पती सासू व आजी, आजोबा व कुटुंबीयांचे प्रोत्साहन लाभले.

# अकरावीचा कटऑफ दोन टक्क्यांनी वाढला

## विज्ञान शाखा : विवेकानंद महाविद्यालयाचा कट ऑफ ९२ टक्क्यांवर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीच्या प्रवेशासाठी राबविलेल्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेनुसार यंदा विज्ञान आणि वाणिज्य शाखेसाठी सर्वच महाविद्यालयांत अकरावीचा कटऑफ सरासरी दोन टक्क्यांनी वाढला आहे, अशी माहिती शिक्षण उपसंचालक कार्यालयातील सहायक शिक्षण संचालक स्मिता गौड यांनी शुक्रवारी दिली.

विवेकानंद महाविद्यालयातील विज्ञान शाखेचा यंदाचा कटऑफ ९२ टक्के इतका असून, गतवर्षीच्या तुलनेत तो २ टक्क्यांनी वाढला आहे. गतवर्षी तो ९० टक्के होता. त्यापाठोपाठ न्यू कॉलेजचा कटऑफ



९१ टक्के इतका असून, गतवर्षी तो ८९ टक्के होता. राजाराम कॉलेजचा टक्का ९०.४० टक्के झाला असून, गतवर्षी तो ८८.४० टक्के होता. दरम्यान, वाणिज्य शाखेसाठी यंदा कॉलेज ऑफ कॉमर्स महाविद्यालयात ९१ टक्के कटऑफ झाला असून, गतवर्षी तो ८९.८० टक्के होता. त्यापाठोपाठ विवेकानंद कॉलेजचा कटऑफ ८६ टक्के इतका झाला असून, तो गतवर्षी ८३ टक्के होता.

### विज्ञान शाखेकडे कल वाढला

- दहावीच्या परीक्षेत मिळालेले भरघोस गुण, जादा संख्येने ऑनलाईन पद्धतीने भरलेले अर्ज आणि विज्ञान शाखेकडे वाढलेला विद्यार्थ्यांचा कल यामुळे गतवर्षीच्या तुलनेत अकरावीसाठी प्रवेशांची संख्या वाढल्याने यंदाचा कट ऑफ वाढला आहे.
- यंदा सीबीएसई आणि आयसीएसईच्या तुलनेत राज्य मंडळांच्या विद्यार्थ्यांनी गुणवत्तेच्या बाबतीत चांगलीच प्रगती केली आहे. वाणिज्य आणि कला शाखेला जाण्याऐवजी विद्यार्थ्यांनी विज्ञान शाखेला अधिक पसंती दिल्याचे दिसून येते. त्यामुळे या शाखेत उत्तीर्ण विद्यार्थी व उपलब्ध जागांचे व्यस्त प्रमाण दिसत आहे.
- भविष्यातील विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेकडे प्रवेश घेण्यासाठी विज्ञान शाखेचा मार्ग विद्यार्थ्यांनी धरल्याचे आढळून येतो. क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे अर्ज आल्याने या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात क्षमता वाढवून देण्याचा पर्याय समितीकडे आहे. नोकरीची संधी आणि तेथील स्पर्धा लक्षात घेउन यावेळी विद्यार्थ्यांनी उत्तम गुण मिळवलेले आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखा निवडण्यासाठी पालकांचा आग्रह हे देखील कारण आहे. ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्याची संख्याही लक्षणीय आहे.

22/06/24

22/6/24

लोकमत
शनिवार २२.६.२०२४

# पहिल्या फेरीत ४५१७ जणांचा अकरावीसाठी प्रवेश निश्चित

## २७ जूनपासून दुसरी फेरी : विज्ञानला ३८४४ जणांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क


**कोल्हापूर :** कोल्हापूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीच्या प्रवेशासाठी राबविलेल्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेंतर्गत पहिल्या फेरीत प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांची यादी समितीने शुक्रवारी जाहीर केली. पहिल्या फेरीत ४५१७ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असून २७ जूनपासून तीन दिवस दुसरी फेरी सुरू होणार आहे. एकूण तीन फेऱ्यांमध्ये प्रवेश निश्चिती करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांची निवड यादी कनिष्ठ महाविद्यालयनिहाय www.dydekop.org या साईटवर व संबंधित महाविद्यालयांच्या फलकावर प्रसिद्ध केली आहे. विज्ञान शाखेसाठी ५९६० इतकी प्रवेश क्षमता असून ६१३१ अर्ज स्वीकृत झाले आहेत. त्यापैकी पहिल्या फेरीत ३८४४ विद्यार्थ्यांची प्रवेश निवड यादी जाहीर करण्यात आली आहे. या शाखेतील २२९४ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे कॉलेज मिळाले असून ४९५ विद्यार्थ्यांना दुसऱ्या क्रमांकाच्या पसंतीचे कॉलेज दिले आहे. पहिल्या फेरीत या शाखेसाठी प्रवेश न मिळालेल्या २११३ विद्यार्थ्यांना दुसऱ्या फेरीत प्रवेश देण्यात येणार आहे.

वाणिज्य शाखेसाठी १२८० इतकी प्रवेश क्षमता असून १०९२ अर्ज स्वीकृत केले होते. पहिल्या फेरीत या शाखेत ६७३ विद्यार्थ्यांना महाविद्यालय प्रवेश देण्यात आला आहे. यातील ३७७ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे तर १५५ विद्यार्थ्यांना दुसऱ्या पसंतीचे महाविद्यालय दिले आहे. उरलेल्या ४०० विद्यार्थ्यांना दुसऱ्या फेरीत प्रवेश देण्यात येणार आहे. यंदा या शाखेसाठी एकूण प्रवेश क्षमतेपेक्षा १७५ अर्ज कमी आले आहेत. पहिल्या फेरीमध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील फेरीमध्ये २५१३ प्रवेश मिळणार आहे. दुसऱ्या फेरीत ३० जून ते २ जुलै या कालावधीत प्रवेश अर्ज छाननी व निवड होणार आहे.


दरम्यान विविध महाविद्यालयांत शुक्रवारी सायंकाळपर्यंत ३५९ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश घेतले. तसेच प्रवेश निवड यादीवर पहिल्याच दिवशी एका विद्यार्थ्याने तक्रार केली असून ती मान्य करण्यात आली आहे.

### प्रवेश मिळालेले विद्यार्थी






अकरावी प्रवेशाची पहिली यादी शुक्रवारी प्रसिद्ध झाल्याने विवेकानंद कॉलेजच्या सूचना फलकासमोर विद्यार्थ्यांनी गर्दी केली. (छाया : नसीर अत्तार)




### यादी पाहण्यासाठी आवार फुलले

**१** केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीने शहरातील विविध ४४ कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावी प्रवेशाच्या पहिल्या फेरीची निवड (गुणवत्ता) यादी शुक्रवारी जाहीर केली. प्रवेश मिळालेल्या महाविद्यालयांची माहिती या समितीने विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारे कळविली आहे. त्यामुळे सर्वच महाविद्यालयांच्या सूचना फलकावर प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे महाविद्यालयात विद्यार्थ्यांची गर्दी झाली होती.

**२** समितीने या विद्यार्थ्यांना तातडीने प्रवेश घेण्यासाठी २५ जूनपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मूळ कागदपत्रासह त्यांच्या निवड झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयात त्या-त्या महाविद्यालयाच्या सूचनेनुसार प्रवेश घेण्यास सांगितले आहे.

**३** त्यानुसार शुक्रवारी प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली आहे. शहाजी कॉलेज, महावीर महाविद्यालय, विवेकानंद कॉलेज, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, न्यू कॉलेज, गोखले कॉलेज, कमला कॉलेज, राजाराम महाविद्यालय, कॉमर्स कॉलेज आदि महाविद्यालयात विद्यार्थ्यांची झुंबड उडाली.



कोल्हापूर : अकरावी प्रवेशासाठी विवेकानंद महाविद्यालयात विद्यार्थ्यांची रांग लागली होती. (छाया : नाज ट्रेनर)

# विज्ञान, वाणिज्य शाखांसाठीचा कटऑफ दोन टक्क्यांनी वाढला

## अकरावी प्रवेश पहिल्या फेरीची निवड यादी जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावीच्या केंद्रीय प्रवेशाच्या पहिली फेरीची निवड गुणवत्ता यादी शुक्रवारी प्रसिद्ध झाली. यंदा विज्ञान आणि वाणिज्य (इंग्रजी) शाखांसाठीचा कटऑफ दोन टक्क्यांनी वाढला आहे. पहिल्या फेरीत सुमारे ४ हजार ५७१ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे. प्रवेशासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी २५ जूनपर्यंत कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश निश्चित करावा लागणार आहे, अशी माहिती प्रभारी शिक्षण उपसंचालक स्मिता गौड यांनी दिली.

शिक्षण उपसंचालक कार्यालयाने शुक्रवारी सकाळी निवड यादी www.dydekop.org संकेतस्थळ व कनिष्ठ महाविद्यालयांत प्रसिद्ध झाली. विज्ञान शाखेसाठी ५,९६० प्रवेश क्षमता असून, त्यासाठी ६,२५२ अर्ज आले. छाननीनंतर ६,१३१ अर्ज स्वीकृत झाले. त्यापैकी पहिल्या फेरीमध्ये ३,८४४ विद्यार्थ्यांची प्रवेश निवड यादी जाहीर केली आहे. विज्ञान शाखेसाठी ३,८४४ पैकी २,२९४ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंती क्रमाचे, तर ४९५ विद्यार्थ्यांना दुसऱ्या क्रमांकाच्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे. विज्ञान शाखेसाठी २,११३ विद्यार्थ्यांना पहिल्या फेरीत प्रवेश मिळाला नाही.

वाणिज्य शाखेसाठी १,२८० प्रवेश क्षमता आहे. या वर्षी १,१०५ अर्ज आले. त्यापैकी छाननीअंती १०९२ अर्ज स्वीकारण्यात आले. पहिल्या फेरीत वाणिज्य शाखेत ६७३ विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी निवड झाली आहे. पहिल्या फेरीत ३७७ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंती क्रमाचे, तर १५५ विद्यार्थ्यांना दुसऱ्या पसंती क्रमाचे महाविद्यालय मिळाले आहे. वाणिज्य शाखेत पहिल्या फेरीत प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या ४०० आहे. वाणिज्य आणि विज्ञान शाखांत पहिल्या फेरीमध्ये प्रवेश न मिळालेल्या २,५१३ विद्यार्थ्यांना पुढील प्रवेश फेरीमध्ये प्रवेश मिळणार आहे. याबाबतचा एसएमएस विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर पाठविण्यात आला आहे. पत्रकार परिषदेला शिक्षण निरीक्षक हेमंत बिराजदार, प्रवेश परीक्षा समितीचे कार्याध्यक्ष प्रा. जे. आर. जोशी, प्रा. एम. एल. जाधव, प्रा. व्ही. बी. डोणे, प्रा. ए. एम. कोतवाल, देवेंद्र भोसले आदी उपस्थित होते.

**४ हजार ५१७ विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित**

पुढारी MISSION ADMISSION

**अकरावी प्रवेश विज्ञान, वाणिज्य इंग्रजीचा कटऑफ**

| शाखा | कॉलेज | मागील वर्ष | चालू वर्ष |
|---|---|---|---|
| विज्ञान | विवेकानंद कॉ. (अनुदानित) | ९०.०० | ९२.०० |
| | (विनाअनुदानित) | ८६.२० | ८८.८० |
| | न्यू कॉलेज | ८९.०० | ९१.०० |
| | राजाराम कॉलेज | ८८.४० | ९०.४० |
| वाणिज्य | कॉमर्स कॉलेज | ८९.८० | ९१.०० |
| | विवेकानंद कॉ. | ८३.०० | ८६.०० |
| | डी. डी. शिंदे सरकार | ८२.२० | ८३.४० |

### निवड यादीबाबत दोन दिवस ऑनलाईन तक्रारीची मुभा

विद्यार्थ्यांना निवडीबाबत तक्रार असल्यास २१ व २२ जून या कालावधीत www.dydekop.org संकेतस्थळावर लॉगीनमधून ऑनलाईन तक्रार करता येणार आहे. ऑनलाईन तक्रारच केवळ ग्राह्य धरली जाईल. हवे असलेले कॉलेज मिळाले नाही, दूरचे कॉलेज मिळाले, दळणवळणाची सुविधा नाही, अशा प्रकारच्या तक्रारींचा विचार केला जाणार नसल्याचे शिक्षण उपसंचालकांनी स्पष्ट केले.

### महाविद्यालयांची होणार चौकशी

अकरावी प्रवेश झाल्यावर महाविद्यालये व खासगी क्लास यांच्यात काही ठिकाणी सेटलमेंट केली जाते. विद्यार्थी महाविद्यालयात कमी व क्लासमध्ये जास्त दिसतात. या प्रश्नाला उत्तर देताना प्रभारी शिक्षण उपसंचालक गौड यांनी माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना याबाबत पत्र लिहून महाविद्यालयांची पडताळणी करण्याच्या सूचना देणार असल्याचे सांगितले.